# NSS Activity 2022-23

| | |
|---|---|
| **Event Title** | चिखलदरा येथील साहसी क्रीडा शिबिरात सांगोला महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्याचा सहभाग |
| **Organized BY** | |
| **Date of Organization** | २ ते ६ नोव्हेंबर २०२२ |
| **Funding Agency** | - |
| **Collaboration /MOU** | - |
| **Description** | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथून सांगोला महाविद्यालयाचे २ विद्यार्थी व सोलापूर व बार्शी येथील २ विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला.या संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी  कार्यक्रम अधिकारी डॉ.बबन गायकवाड यांना संधी मिळाली. |
| **Photographs** |  |

चिखलदरा येथील साहसी क्रीडा शिबिरात सांगोला महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी



सांगोला (प्रतिनिधी):- उच्च व तंत्र शिक्षण विभाग राष्ट्रीय सेवा योजना मंत्रालय मुंबई व गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २ ते ६ नोव्हेंबर २०२२ या काळात साहसी क्रीडा शिबिर अमरावती चिखलदरा येथे पार पडले. या शिबिरात एकूण ४६ मुले व ४६ मुली यांनी महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातून सहभाग नोंदवला.

यामध्ये १५ कार्यक्रम अधिकारी यांचाही समावेश होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर येथून सांगोला महाविद्यालयाचे २ विद्यार्थी व सोलापूर व बार्शी येथील २ विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदविला. या संघाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ.बबन गायकवाड यांना संधी मिळाली. या शिबिरात क्रीडा प्रकारांची प्रात्यक्षिके व माहिती स्वयंसेवकांना देण्यात आली कॉलेजच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते शिबिरात सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचा सानिका शितोळे व सतीश  मेटकरी यांचा सत्कार करण्यात आला.

या शिबीरासाठी पु.अ.हो. सोलापूर विद्यापीठातील संचालक डॉ.गुणवंत सरवदे व प्रा.सचिन सुरवसे (कॉमर्स विभाग), सांगोला यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.